# प्रकरण तिसरे

# प्रकरण तिसरे : मंदा कदम यांची कविता :

## प्रस्तावना :

मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळ, ऋतुनाद आणि दीर्घकाव्यसंग्रह चंदनाचे देणे अशा एकूण चारही काव्यसंग्रहात १२६ कविता असून सृष्टीवर्णन, प्रीती, सामाजिक, महानगरीय, व्यक्तीपर, वात्सल्यभाव, अध्यात्मिक असे काही ढोबळ वर्ग पडतात. कारण या वर्गातील विषय परस्पराहून अगदी विलग नसून भेसळ झालेली आहे.

तृप्त प्रेमभावाबरोबर निसर्गाचे लोभस, उदास, खिन्न रुप पहाता येते. सामाजिक कवितेतून वास्तव स्थितीचे दर्शन होते. तर काही कवितांतून परमेश्वराच्या अनिवार ओढीची तीव्रता दिसते. म्हणून प्रत्येक वर्गातील कविता अजमावून पहाण्याचा प्रयत्न आहे.

## निसर्ग कविता :

सृष्टीसौंदर्य हा फार प्राचीन काळापासून ते सद्य:स्थिती पर्यंत अनेक कवींच्या काव्याचा विषय झाला आहे. अगदी आदिमानवालाही निसर्गातील गूढ, अद्भूत दृश्ये ही मोहिनी घालणारी वाटली. याचा निर्माता ईश्वर असेल अशी त्याने कल्पना केली आणि निर्सगाकडे त्याने विभूतीपूजेच्या दृष्टीने पाहिले. व या सृष्टीच्या भव्य सौंदर्यापुढे तो नम्र झाला. निसर्गाने घालून दिलेल्या नियमानुसारच तो वागू लागला. याचे प्रतिबिंब काव्यामध्ये उमटलेले दिसून येते. निसर्गविषयक प्रेम आजच्या दृष्टीने अवास्तव वाटले तरी पूर्वीच्याकाळी ते अपरिहार्य होते. 'प्राचीन कवींच्या प्रमाणे अर्वाचीन कवींमध्ये निसर्गसौंदर्याची ओढ तीव्रपणे दिसून येते.

> ''जेथे ओढे वनराजी
> वृत्ती रमे तेथे माजी''

अशा साध्या शब्दात केशवसुतांनी आपले निसर्गप्रेम व्यक्त केले आहे. निसर्गात असणारी ही प्रधान वैशिष्ट्ये असून अशा ठिकाणी केशवसुत रममाण होतात. तर बालकवी निसर्गावर एकनिष्ठ प्रेम करतात. निसर्गातील नानाविध पदार्थांवर मानवी भावनेचा आरोप करुन या कवीने सुख दु:खाची गाणी गायिली आहेत.'[१]

''सुंदरतेच्या सुमनावरचे दवबिंदू चुंबून घ्यावे
चैतन्याच्या गोड कोवळ्या उन्हात हिंडावे''

अशी अभिलाषा बाळगणाऱ्या या कवीला निसर्गच आपले इच्छित पुर्ण करणार अशी आशा वाटते. मात्र बालकवींनी ज्या मार्गाने निसर्ग कविता लिहली त्या अर्थाने केशवसुतांनी लिहिली नाही. निसर्गाकडे बघण्याचा एक नवा दृष्टीकोन त्यांनी दिला. प्राचीन कवींपेक्षा वेगळ्या दृष्टीने केशवसुत निसर्गाकडे पहात होते. परमेश्वर जळी, स्थळी, काष्टी, पाषाणो असतो. कोणत्याही क्षणी, कोणत्याही रुपात तो प्रकट होतो, साक्षात्कार घडवितो ही प्राचीनांची श्रध्दा होती. निसर्ग हे परमेश्वराचेच एक रुप आहे अशी त्यांची धारणा होती. केशवसुत, बालकवी बरोबर गोविंदाग्रज, भा. रा. तांबे, कवी रेंदाळकर, बा. भ. बोरकर, मंगेश पाडगांवकर, इंदिरा संत, शांता शेळके, शिरीष पै तर अलीकडील ना. धों. महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, वासंती मुझूमदार यांनी निसर्ग कविता मोठ्या प्रमाणात लिहिली आहेत आणि आपल्या मनातील भावना निसर्ग प्रतिमांचा आधार घेवून प्रकट केल्या आहेत.

कवयित्री मंदा कदम या तर भावकवयित्रीच आहेत. त्यांच्या भावविष्कारात निसर्गाचा अतुट संबंध आहे. विविध अर्थछटा, भावछटा व्यक्त करताना निसर्गातील सर्व गोष्टींचे संदर्भ येतात. संवेदनशील मनाच्या या कवयित्रीने निसर्गावर भरभरुन प्रेम केले आहे. निसर्गातील लोभस, खिन्न, रौद्र, उदास रुपे पहाताना त्यांच्याही मनात भावनांची आवर्तने सुरु होतात. कातरवेळ, साजणवेळ आणि ऋतुनाद या संग्रहात बहुतांशी कवितांत मानवी भावनांना शब्दरुप देण्यासाठी कवयित्रीने निसर्गाचा आधार घेतलेला आहे. त्यामुळे ह्या संग्रहात आशयसौंदर्याएवढेच स्थान निसर्गालाही लाभले आहे. यात निसर्ग विविध रुपात साकारतो. पहाटेच्या उगवतीच्या लालसर छटेपासून कातरवेळेच्या खिन्न छटेसह चांदण्यांच्या अलवार रुपापर्यंत अनेक रुपात निसर्ग आपल्यापुढे अवतरतो. निसर्ग हे कवयित्रीच्या दृष्टीने ईश्वराचेच रुप. त्या म्हणतात,

'मला अस्ताचलावरील सूर्य, वृक्षांच्या राया, पाऊसधारा, वेलींचे सांभार, पक्षांचे थवे, तृणांकुरांची हिरवी पाती, बेभानपणे वाहणारे वारे, पक्षांची घरटी, निळ्या मोरांचे नृत्य, पानझडीच्या वाटा, स्वप्नपिसोळी, आषाढी घन, चंद्रझरे, वादळे, नक्षत्रांचे पूर, सीमातीत दिशा, निष्पर्ण झाडे, भूमी, सर्व ऋतु, सर्व मास यांच्या सर्व वैशिष्ट्येपुर्ण सौंदर्याचे आकर्षण आहे. कधी हा निसर्ग

स्वतंत्रपणे जाणवतो आणि मनात तरंग उठवितो, तर कधी तो माझ्या भावनांच्या सोबतीने सहप्रवाशी बनून येतो.'[२]

अशा निसर्गाचे स्पष्टपणे प्रतिबिंब उमटते ते 'आरास' कवितेत. सावरीच्या कापसाप्रमाणे हलके हलके झालेले कवयित्रीचे मन फुलपाखरी क्षणात हर्षाचा पाऊस उपभोगते.

पहा,

कोवळी कोवळी पाने
गर्भ रेशीम मने
मनात दडलेले,
अबोधाचे गाणे.......

(कातरवेळ - पृ. १०)

असे हे गाणे रंगत जाते. त्याचक्षणी ते निसर्गाच्या या रुपातही मग्न होते.

चिमुकली फुले
चकाकते ऊन
तुडुंब भरलेले
मधुवंती मन ..........

कातरवेळी जेंव्हा प्रियकराची सावळी चाहूल लागते तेंव्हा या मौनवेड्या रातराणीला भरारणारा वारा मनमोहक चंद्रफुलांचा नागचाफी इशारा देतो. फुललेला शेवगा, भांबावलेली मधुमालती यांच्या संगतीने मग इथे प्रेमाची जयजयवंती रंगते. हसू लागलेल्या दिवे लागणीच्या वेळी तिच्या मनात त्याची आठवण पिंगा घालू लागते. या वेळेच्या निसर्गाचे सुरेख असे वर्णन कवयित्रीने केले आहे.

हुरहुरणारी भरली सांज
पश्चिमवाऱ्याचा भारणारा पखवाज
आभाळरंगात न्हायलेले मन
गवती स्पर्शाने थरारलेले मन
अंतराळात भिरभिरणारे चिमुकले पक्षी
भाव कल्लोळांची उजाळलेली नक्षी

'(कातरवेळ - पृ. १८)

दूरच्या खलाटीतुन पौषातील सुर्यासारखे स्नेहस्निग्ध धुके हसत पर येते तेंव्हा, नितळ तलावाच्या काठावर चोचीतून दवं टिपणारी भिरभिरणाऱ्या भिंगर लयीतील पाखरे येतात तेंव्हा कवयित्री आपली एकांकीपणाची व्यथा क्षणभर विसरते. विरहाच्या रात्रींचे पळसवणणे त्यांचा निखारा या निसर्गापुढे ती विसरते.

एखादा पाऊस असा कोसळतो की, त्याला ती नाव देते, 'आज नशेत पाऊस'. प्रेम साफल्याचा आनंद उपभोगत असताना, मन विसरलेला जीव अणुरेणु उधातून प्रीतमोराची निळाई अंगभर लेवून घेतो तेंव्हा तिला नेहमीच्या पावसाचे रुप काही निराळेच भासते.

आज नशेत पाऊस आणि बेहोषीत वारा
जुई आले ती लाजते, करी अंबर इशारा.....
वाट अनंताची पाहे गंध सायलीचा खुळा
वेडी तगार जपते आज यौवन सोहळा !
ओल्या केवड्याचा गंध आज रानभरी झाला
कुठे सांगणासाठी कुणी मल्हार छेडिला !

(कातरवेळ - पृ. ३७)

अशा पावसात झाडे, पानेसुध्दा तिच्यासारखीच धुंद फुंद झालेली असतात तर भयभीत भोळ्या कळ्यांनी पान पान पांघरलेले असते.

तरंग उठवित निळवंती जळ
काठावरती सुंदर मंदिर
बांधावरती हिरवी कर्दळ
फुलवंतीची घेऊन ओंजळ

(कातरवेळ - पृ. ४२)

इथे कवयित्री एक निसर्गचित्रच आपल्यापुढे उभे करते. निळवंती जळाच्या काठावरचे सुंदर मंदिर, त्याच्यापलीकडे हसणारी ओली उतरण, माथा मानून उभे असणारे कौलारु घर, या कवितेतील कवयित्रींची ही कल्पना बालकवींच्या गाजलेल्या औदुंबर कवितेतील प्रारंभाच्या ,

ऐलतटावर पैलतटावर हिरवळी घेवून
निळासावळा झरा पाहतो बेटाबेटातून
चार घरांचे गांव चिमुकले पैलटेकडीकडे

या ओळीवर आधारलेली वाटते. कवयित्रीने निसर्गाचे सौंदर्य सुक्ष्मपणे टिपले आहे.

कवयित्रीला निसर्गाचे वेड आहे. ती म्हणते, वेड मला उडण्याचे । मुक्तपंथि फिरण्याचे । आक्रंदन लहरीचे । नित्य मनी जपण्याचे ।।

तसेच,

तांडवांत जलदांच्या
थयथयाट बिजलीचा
पाहूनिया मन माझे
वेध घेई गगनाचा !

(कातरवेळ - पृ. ५९)

या ओळीतून तिचे निसर्गप्रेम व्यक्त होते. तिचे आणि निसर्गाचे नाते अतूट आहे आणि अनेकदा कवयित्री आणि निसर्ग यांच्यातील भेद संपून अद्वैत होते. ती निसर्गाच्या नाना विभ्रमांनी प्रसन्न होते आणि त्याचबरोबर आपल्या जीवाचे दु:खही निसर्गाजवळ विश्वासाने मोकळे करते.

'मी अशी बहरले होते' या कवितेत ती म्हणते 'मी अशी बहरले होते नभी नक्षत्रांचा पूर । घनगर्द वृक्षसंभारी खयोत छेडीती सूर ! अशा प्रसन्न क्षणी ती बनते आले वस्त्र सावरणारी सांजबावरी राधा-

दुरात पावरी घुमली
झिमझिमली पाऊसगाणी
डोहाला शोधित गेली
की, वाट आडवळणांनी

(कातरवेळ - पृ. २)

'ऋतुनाद' संग्रहातील पहिल्या 'पाऊसगाणी' या शिर्षकाखाली येणाऱ्या कवितांत 'पाऊस' हा बव्हंशी प्रियकर होऊन येतो तो प्रियकराचे सर्व विभ्रमोत्सव होऊन येतो. अशा पावसाची कित्येकदा वाट पाहूनही आगमन होत नाही. तेंव्हा आर्ततेने व्याकुळतेने कवयित्री विचारते की,

किती युगांची प्रतिक्षा
किती युगांची असोशी
जीव व्याकुळ होऊन
प्राण आले गा कंठाशी

(ऋतुनाद- पृ. २)

पाऊस असा दाराशी, तुझ्या झिम्माड मिठीत, गर्द घनावळ, आषाढाच्या अंगणात पाऊस, पाऊसधारा, निळीजांबळी  अशा शिर्षकातून कवयित्री निसर्ग सौंदर्य वाढवितात तर एकप्रकारचे निसर्गचित्र आपल्यासमोर उभे करतात. पहा

आला पहिला पाऊस
मना फुटालीत पाने
निधीनिया गेला मळ
मनी हिरवे चांदणे

(ऋतुनाद - पृ. १५)

इथे पावसाच्या पहिल्या शिडकाव्याने सर्वत्र आनंदाची स्थिती निर्माण झाल्याची जाणीव होते तर मातीलाही घन भेटीस येण्याची आतुरता लागून राहते. पावसाच्या वेगवेगळ्या रुपांनी रसिकांच्या मनाला मोहिनी घातली आहे. हा पाऊस कधी अबोल होऊन येतो तर कधी धुवाँधार, कवयित्री अशा पावसाशी संवाद साधते.

सख्या साजणा पावसा
किती दाखविलेस रंग
कशी जाऊ विसरुन
तुझा जरतारी संग ?

(ऋतुनाद - पृ. २२)

असा प्रश्न विचारते, अशा या निसर्गाच्या मानवाला झालेल्या विस्मरणाबद्दल त्या खंत आणि हुरहुर व्यक्त करतात. निसर्गातील आनंदी आणि सौंदर्य साक्षात्कारास आजचा माणूस परखा झालेला आहे याची सल त्यांना सतत बोचत राहते. त्यांची ही भावना आंग्लकवी वर्डस्वर्थ यांच्या कवितेशी नाते जोडते. या दोघांनाही जाणवलेली, विश्वात भरुन राहिलेली चिद्शक्ती एकच आहे. मंदा कदम यांचा काव्यविष्कार हा उत्सफूर्त आणि हळूवार स्वरुपाचा आहे.

निसर्गाबद्दल कवयित्री म्हणते ‘‘कधी हा निसर्ग स्वतंत्रपणे जाणवतो आणि मनात तरंग उठवितो तर कधी तो माझ्या भावनांच्या सोबतीने सहप्रवाशी बनून येतो. इतकेच काय कधी कधी तो आपले रंग रुप, नादलय, गतिविभ्रम, सारसर्वस्व माझ्या भावनांच्या प्रकटीकरणासाठी मलाच देऊन टाकतो म्हणून त्याच्यातील आणि माझ्यातील अंतर संपूनच जाते.

## प्रेमकविता :

प्रेम ही मानवी जीवनातील सर्वश्रेष्ठ आणि सर्वव्यापी भावना आहे. मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळ, ऋतुनाद ह्या संग्रहात प्रेमभावनेच्या असंख्य छटा प्रत्ययास येतात. प्रेमभावना जागृत होणे, प्रियकराची आर्त प्रतिक्षा, त्याची आठवण कोरीत रहाणे, मीलनोत्सुकता, मीलनानुभव, वंचना, विरह, एकाकी अवस्था, वियोग, वासना, प्रतारणा यासारख्या गहिऱ्या छटा इथे प्रेम कवितांत अवतरल्या आहेत. कवयित्री म्हणते, ''प्रेम हा अखिल सृष्टिचा स्थायीभाव आहे. मानवी सृष्टीत तर या जाणिवेला अधिक अर्थपूर्णता असते. एखाद्या श्यामल सायंकाळी प्रेमपारवा घुमणे, प्रेमबाधा होणे, प्रेमाच्या ताणाबाणामुळ अस्वस्थता येणे क्वचित मिळणाऱ्या एकांतामुळं बोली-अबोली बनणं किंवा शब्दांच्या सीमा संपूर्ण मौनाच्या प्रवासाला सुरुवात होणं या प्रेमाच्या पथावरील स्वाभाविक श्रेणीला कातरवेळेचं सहाय्यच होत असतं.

एकंदर या संग्रहात प्रेमभावनेच्या अनेक भावशलाका प्रत्ययास येतात. तिच्या मनात जागृत झालेल्या प्रेमभावनेचे प्रतिबिंब तिला निसर्गातही प्रत्ययास येते. उदा- 'आज नशेत पाऊस' ह्या कातरवेळ मधील कवितेत तर ऋतुनादमधील पाऊसधारामधून ह्या भावछटा दिसून येतात.

## मीलनाची ओढ :

''हवे कशाला तुजला कोंदण
या नात्याचे त्या नात्याचे''

(साजणवेळा - पृ. १९)

इथे प्रेमिका आपल्या प्रियकराला नात्यामध्ये अडकून पडण्याची गरजच काय आहे. असा प्रश्न करते. इथे नात्याच्या कोंदणात न मावणाऱ्या प्रियकराच्या भेटीची ओढ व आतुरता दिसून येते. 'केशर भेट' मध्ये ती म्हणते

दूर थांबला साजण
मध्ये अनोळखी पाणी
डोळा तुडुंब वादळ
उरी मौनावली गाणी

आणि

शब्दापल्याड साजण
किती झाली पानझड
कुण्या केशर भेटीची
पुन्हा पापणीत ओढ

(साजणवेळा - पृ. २७)

नायिकेच्या डोळ्यात वादळ घोंघावत आहे. उरात पाणी मूक झाली आहेत. बरीच संकटे येऊन गेली आहेत आणि म्हणून साजणाच्या केशरभेटीची ओढ साजणीच्या पापणीला लागून राहिली आहे. या ओढीचे कारणच असे आहे की, त्या साजणाच्या व्यक्तीमत्वाचे अस्तित्व जगण्याला एक निरागस सुंदरता आणि काव्यात्मता देवून जाते.

ऋतुनादमध्ये भेटणारे पाऊसाचे सर्व विभ्रमोत्सव प्रियकर होऊनच येतात. अचानक येणाऱ्या प्रियकराप्रमाणे ह्या पाऊसाच्या आगमनाने धरणी तृप्त होते. धरणीप्रमाणे प्रेयसीने विरहाच्या ग्रीष्मवेदना भोगलेल्या असतात ती म्हणते-

जरी अलंघ्य अंतर
तुझा बेफाम आवेग
माझ्या रक्तात पेटतो
तुझा तुफानी वियोग

(ऋतुनाद - पृ. ११)

प्रियकराच्या न येण्याने व्याकुळ झालेल्या प्रेयसीच्या भावछटा आर्त व्याकुळता, विरहता इथे दिसून येते पुढे ती म्हणते,

किती युगांची प्रतिक्षा
किती युगांची असोशी
जीव व्याकुळ होऊन
प्राण आले गा कंठाशा

(साजणवेळा - पृ. १४)

इथे जाणवणारा अनुभव, अनोखा, अपार्थिव आहे. प्रियकर नेहमीच काही वेळेवर येत नाही त्याच्या प्रतिक्षेत युगान युगे प्राण कंठाशी आणून उभी असलेली प्रेमिका व्याकुळ झालेली आहे. त्याच्या भेटीसाठी आसुसलेल्या प्रेमिकेची आर्त, बेचैन विरहवस्था काळजाला अधिक तीव्रपणे भिडते.

बहुतेक कवयित्रीप्रमाणेच प्रेम हा मंदा कदम यांच्या काव्याचा विषय प्राधान्याने दिसतो आहे. पण त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्य हे की त्यात एक प्रकारची विविधता, रसिकता, संयमीपणा आहे. शब्दजंजाळ किंवा भावनांचा भडक विलास त्यांच्या प्रतिभेचा धर्म नव्हे. प्रेमभावनेच्या प्रवासातील सगळे टप्पे त्यांच्या काव्यातून प्रकट होतात. जुन्या आठवणी दाटून येणे, विलक्षण हुरहुरता, साजणाशी झालेले मीलन नी केलेली हितगुज, प्रतीक्षा, स्मृतिशलाका, विरह-व्याकुळता अशा अनेक भावतंतूची वलये आपणास घडू लागतात. त्याचे प्रतिबिंब दिसून येते 'प्रतीक्षा' ह्या कवितेते नायिका म्हणते.

किती पाहिली मी वाट
दारी शिणला रे माठ
परी मिटवू कसे मी
माझ्या मनाचे कवाड

प्रतीक्षा करणे म्हणजे खरेच जीवघेणा अनुभव. त्यात एखाद्याची वाट पहाणे जीवघेणी प्रतीक्षा ठरते.इथे प्रेयसी आपल्या सख्या साजणाची वाट पाहून थकून गेली आहे. आयुष्याच्या शेवटीही तिची त्याच्याभेटीसाठी ओढ आहे. तिच्या मनाचे दार त्याच्यासाठी सतत उघडे आहे.

एकंदर ही कविता एका आश्वासक स्त्रीच्या भावना प्रकट करते. नायिकेची ओढ आहे पण अतिशय संयमीपणे ती व्यक्त करते आहे. 'आठवण' ह्या कवितेतही नायिका आपल्या मनामध्ये उसळलेल्या भावनांना व्यक्त करते. तिला सायंकाळ संपुर्णता उदासवाणी भासते. पश्चिमेच्या क्षितीजावर उमटलेले इंद्रधनुष्याचे रंग आणि त्या आभाळरंगात हरविलेले नायिकेचे मन, अंतराळात भिरभिरणाऱ्या चिमुकल्या पक्षाप्रमाणे सांजवेळच्या चारहि दिशांना भिरभिरणारे तिचे मन. अशा दिवे लागणीच्या वेळी तिला त्याची आठवण येते आणि ती मोहरुन येते, बेभान होते.

अशाच आठवणीचा गहिरेपणा जाणवतो तो 'तेंव्हा मात्र' (कातरवेळ क्र.२०) कवितेत 'ती' म्हणते की मी विसरते असंख्य रात्रीचे पळसवणवे, त्यांचा निखारा, प्रदीर्घ मध्यान्हीच्या वेळी ऐकू येणारा तुझा स्वर, एक स्वप्न म्हणून मी विसरते पण

सर्व दिशांनी
धावत येते, कातरवेळ
तेंव्हा मात्र
छळत राहते तुझी आठवण
हट्टी मुलासारखी.

कातरवेळी प्रमीजनांना मोठ्या प्रमाणात व्याकुळता जाणतवे. तिन्ही सांज करकरणारी वाटु लागते. कातरवेळी रानपाखरांचा स्वर अशुभ वाटू लागतो. एक प्रकारची विलक्षण हुरहुर मनात दाटून येते. अशा वेळी तिला त्याची आठवण हट्टी मुलासारखी छेडते. हि कविता जुन्या गहिऱ्या आठवणींची जाणीव करुन देते.

ज्याप्रमाणे मानवी जीवनात येणाऱ्या पहिलं प्रेम, पहिला पाऊस, पहिलं मीलन ह्या पहिल्यावहिल्याचा आनंद आगळा वेगळा असतो. तसं जुन्या गहिऱ्या आठवणींचं असतं. त्या जाता जात नाहीत. त्या सतत माणसाला आयुष्यभर सोबत करतात. 'सेतू' (साजणवेळी पृ-३२) कवितेतील नायिका अशाच दूर गेलेल्या आठवणींना उराशी कवटाळून जीवन जगु पाहते आहे. पण नियती तिचा हा सगळा डाव उधळून टाकते. ती म्हणते,

''आठवणींचे सागरगोटे
पुन्हा पुन्हा मी करिते गोळा
घोंगावत पाण येते वादळ
उधळून जातो डाव मांडला''

याठिकाणी कवयित्रीने आपल्या भावनांना मूर्त रुप देताना मानवी जीवनात असणारे नियतीचे स्थान स्पष्ट केले आहे. अतिशय प्रभावी कल्पनेतून स्त्रीमनातील भावनेला दृगच्चर केले आहे.

आपल्या प्रियकराच्या आठवणींने व्याकूळ झालेली ही नायिका त्याला प्रश्न करते की,

किती दूर तू, किती दूर मी
कुणी कुणाला विसरायचे
करते कधी धन् किती कितीसे

(साजणवेळा - पृ. ३२)

आपल्यामध्ये असणारे हे अंतर फार दूर, फार लांबचे आहे. आपण उधळलेले प्रीतीचे रंग, भावनांची झालेली गुंतागुंत माझ्या सर्वांगाल लपेटून वसलेली आहे. त्यामुळे त्या क्षणी कुणी कुणाला विसरायचे असा 'आर्त' स्वर ती काढते.

एका उत्कट प्रीतीचे दर्शन कवितेमधून घडते. बरोबरच ह्यांच्या विलगतेला काळच कारणीभूत असल्याची जाणीव होते. काळ, वेळ सरकत सरकत पुढे गेला तसे ह्या दोघांमधील अंतर

वाढतच गेले. ना भेट ना दर्शन. अशा वेळी एकमेकांच्या आठवणीशिवाय या प्रेमिकांच्या जवळ काहीच शिल्लक राहत नाही.

'कशिदा' (साजणवेळ क्र. ) कवितेमध्ये ती सांगते की,

प्रहर उलटले..... काळ सरकला
डोळ्यामधुनी झरती धारा
आठवणींचे अवघे पक्षी
रक्तातून मग होती गोळा

प्रेमातील दिवस पूर्वीसारखे राहिले नाहीत. काळाच्या प्रवाहाबरोबर निघून गेले. अशा वेळी विविध रंग, रुपाद्वारे आठवणी भरभरुन येतात. शरीराच्या रंध्रारंध्रामध्ये त्याची तीव्रता भरुन राहते. हातात काहीच उरलेले नसते. त्यामुळे डोळ्यांच्या कडा पाणवतात. अश्रूंच्या एका एका थेंबामध्ये प्रियकराच्या आठवणी स्पष्टपणे दिसून येतात.

इथे त्याच्या आठवणीत रमून जाणारी नायिकेची विनयशील वृत्ती, त्याचा आठव, प्रेमसहवासातील मृदु क्षणांना अलवारपणे चित्रीत करते. भुतकाळातील प्रेमभंगाचा आलेख रेखाटते. त्यातून तिच्या उत्कट भावजीवनाची स्थित्यंतरे प्रभावीपणे आविष्कृत होतात. प्रेमातील नवथरपणा, लपंडाव, होय नाहीचा जीवघेणा छळवाद, सुगंधी सहवासचा अनुभव प्रत्ययपूर्ण होतो. प्रेमनिराशेची गहिरी छटा त्यांच्या या काव्यातून प्रकटते.

## अनामिक नात्यातील प्रेमभाव :

'तिथेच जाऊ' (कातरवेळ - पृ. १९)या कवितेत कवयित्रीची एक आदर्श प्रेमकल्पना व्यक्त होते. कवयित्री म्हणते,

''का न असावी असली माती
जिथे अनामिक नाती रुजती''

या नातेसंबंधाविषयीच्या भावना इथे प्रकटतात. हे नातं असं आहे की ज्यामध्ये व्यवहारिकता नसते, निनिमय प्रदर्शन नसते. तर विशुध्द मनाने केलेली प्रीती असते. मग अशा चाकोरीबाह्य समजल्या जाणाऱ्या नात्यांसाठी समाजमान्यता का मिळू नये असे तिला वाटते म्हणून ती म्हणते,

सख्या साजणा तिथेच जाऊ
जग मायावी जिथे न स्वार्थी
व्यवहारांचे कंटक भेदून
जिथे विमुक्तच फुलते प्रीती !

जिथे या स्वार्थी, व्यवहारी जगाचे कुंपन नसेल, जिथे प्रेमाच्या पवित्र नात्याला आखीव तटबंदीची चौकट नसेल, जिथे खुल्या दिलाच्या दर्शनमात्रे हृदय मनोगत हसावे. हृदयामधला उभा दिलासा जिथे कुणाल बुरा वाटणार नाही अशा स्वप्न भूमीतच ही विमुक्त प्रीत फुलेल.

या कवितेतील ही कल्पना माधव ज्युलीयन यांच्या 'तेथे चल राणी' या सुप्रसिद्ध कवितेशी मिळती जुळती आहे.

रेशीम नातं असच एक अनामिक असते. लौकिक जगापासून दूर असते. म्हणून हे नातं अधिक लोभस आणि खरं असतं. यात आसक्ती, दडपण, स्वार्थ या गोष्टींना स्थान नसते. उलट एकप्रकारचा आदरयुक्त संयम असतो. म्हणून इथे प्रीती विमुक्तपणे फुलते. पण असे रेशीम नाते जपताना समाजाचा रोष स्वीकारावा लागतो. चुकण्याचे क्षण मोजावे लागतात. निमिषाच्या भेटीसाठी धारधार भाले सोसावे लागतात. काट्यांचा मोसम लक्षात ठेवावा लागतो.

कवयित्री म्हणते की, हे नातं असं आहे की जे झुंडीसमोर रुखवती थाटात मांडता येत नाही. बटबटीत जडशीळ साखळ्यांनी मढवावं, भकभकीत उजेडाच्या माऱ्यानं भाजून निघावं असं नसावं रेशीम नातं.

'निमिषाच्या भेटीसाठी या कविततेत ती म्हणते -

तुझ्या अंगणात माझ्या
प्राजक्ताशुभ्र फुलांसाठी एक कोपराही नसावा
समजावे लागू नये कोणा एकाला
निरर्थक असा एक क्षणही नसावा

(कातरवेळ - पृ. ३०)

## स्वप्नप्रेम :

प्रेम साफल्याचा, तृप्तभावनेचा आनंद उपभोगताना प्रेमिका आपल्या प्रियकराची आठवण स्वप्नातही घेताना दिसते. कवयित्री म्हणते,

तुझ्यापेक्षा तुझे स्वप्न
हृदयालगत बिलगून आहे
तुझ्यासारखा आतला कप्पा
त्याने राखून ठेवला नाही.

(कातरवेळ - पृ. १६)

प्रियकरापेक्षा त्याच्या स्वप्नांना हृदयात ठेऊन जगणारी प्रिया इथे आपणाला भेटते, त्याचे अस्तित्व, त्याचा आठव, स्मृती ह्यांना तिच्या जगण्यात स्थान नाही. कवयित्रीला प्रियकरापेक्षा एकांत फार जवळचा वाटतो करण प्रियकराप्रमाणे विजसारखे निघून जाणे ती अजून शिकली नाही की हृदयातला एखादा कप्पा त्याने राखून ठेवला नाही. ती म्हणते,

तुझी स्मृती, तुझे स्वप्न
सारे मला प्रिय आहे

सारे स्वप्नमय प्रेम आशावादाने भरलेले आहे. अशाच प्रकारे प्रज्ञा गोळे यांच्या निहार काव्यसंग्रहातील नायिका स्वप्नप्रेमाचा अनुभव घेताना दिसते.

अंगणात ज्यावेळी पिंपाळाच्या पानाची सळसळ सुरु होते तेंव्हा नायिकेच्या पापणीवर प्रियकराचे स्वप्न दाटून येते. केळीच्या पानाआडून होणारा पाखराचा ओलसर स्वर कवयित्रीच्या कानावर येताच तिचा उर धपापून येतो. कवयित्री 'स्वप्नसर' मध्ये म्हणते की,

डोळ्यामध्ये दटावणी
शब्द अर्धा ओठावर
बोलायचे होते काही
ओघळला स्वप्नसर

(साजणवेळा - पृ. १६)

## संयमी प्रेम :

प्रेमामध्ये मीलनोत्सव, मीलनोत्सुकता, व्याकूळता, प्रतीक्षा या भावनांगला महत्व असते. जितक्या जास्त प्रमाणात उत्कटता असते तितकीच विरहाची व्यथा असते. तरीही प्रेमाच्या या अवस्थामध्ये संयम फार महत्वाचा असतो.

किती सांगू तुला, सगळा गंध उधळू नकोस

परत एकदा 'मेघदूत' निर्माण व्हायला नको अशी विनवणी प्रेयसी प्रियकराला करते. स्त्रीपुरुष प्रेमाची उत्कटता, प्रणय विरहाची असीम अवस्था आणि प्रीतीच्या विविध अविष्काराचे एक उत्तम उदाहरण म्हणजे महाकवी कालिदासांचे मेघदूत. त्यात कसलीही राजकीय, सामाजिक बांधिलकी नाही असं मेघदूत पुन्हा निर्माण करायचे का तुझे नि माझे? असा प्रेयसीने केलेला प्रश्न रसिकांना अंतर्मुख बनवितो. इथे दिसणारा प्रियेचा संयम एकप्रकारचे मनोबल निर्माण करतो.

'उठ सजणी मध्ये असाच साजण आपल्याला भेटतो,

''उठ सजणी, उठ सजणी
उचल आता पाऊले
दूर नाही क्षितिज अपुले राहिले''

(कातरवेळ - पृ. ६)

असे तो प्रियेसेला समजावतो आहे. क्षितिजाच्या जवळ जाण्याची त्याची तयारी आहे.

'अस्ताई' कवितेतही असाच आग्रह आहे.

निरवुनि सारे उगी राहावे
सरोजपत्रापरी जलाशयी
दूर राहूनी तुला पहावे
गुणगुणताना ही अस्ताई

इथे प्रियकराच्या सामर्थ्यांचे नेटके रुप आपल्याला गवसते. मानवी संबंधाकडे मानसाने स्वच्छ दृष्टीने पहाणे आवश्यक आहे. अशी धारणाही या ठिकाणी व्यक्त होताना दिसते. इथे पद्मा गोळे यांच्या 'निहार' संग्रहातील 'या रस्त्यातच' ह्या कवितेची आठवण होते.

तो रस्ता, ते घुटमळणे, ती दृष्टीभेट
ते बोल, स्मरता जातो
अजूनही केंव्हा
सभ्य मनाचा तोल

(निहार - पृ. ४४)

या कवितेत कवयित्रीने संयमित प्रेमाचे वर्णन केले आहे. रस्त्यातच उभ्या उभ्या नायक बोलतो आहे पण ती ऐकत नाही. तो जाताना दोघांच्या नजरा परस्परांना मिळतात. आपल्या भावनांना आवर घालणारी संयमित सभ्य अशी कवितेची नायिका आहे.

## विरह-वियोगाचे दु:ख व्यक्त करणाऱ्या प्रेमकविता :

प्रेमभावनेच्या प्रवासातील सगळे टप्पे कवयित्रीने आपल्या संग्रहातून प्रस्तुत केले आहेत. प्रीतीच्या कपाळी विरहाची व्यथा असतेच. सुर्योदयाबरोबरच सुर्यास्तही भोगावाच लागतो. ऋतू मागून ऋतू सरत राहतात पण तिच्यासाठी कधी मुहूर्तच नसतो. हे वंचनेचे, एकाकीपणाचे समर्पणाचे आणि वियोगाचे दु:ख व्यक्त करणाऱ्या असंख्य प्रेमकविता संग्रहात येतात.

तिच्या व त्याच्या दूर जाण्याने चंद्रहो लाजरा स्वप्नदिवाना असतो. तो आता उदास उदास भासतो. गुणगुणणाऱ्या रातकिड्यांनाही कुणाची तरी दृष्ट लागते. 'आज असा का' या कवितेत कवयित्री म्हणते, आज असा का उदास भासे चंद्र लाजरा स्वप्नदिवाना ? असा प्रश्न तिला पडतो.

'तव गमनाने..... तवविरहाने
लोपुनि गेले भावतराणे
दुराव्यात सखयेच तुझ्या गे
चैतन्याचे सरले गाणे !

'कातरवेळ' ही विरहाची भावना आणखी गहिरी करते. तेंव्हा मात्र कवितेत ती म्हणते, 'दूरवरच्या खलाटातून हसत हसत धुके वर येते तेंव्हा, नितळ तलावाच्या काठावर चिमुकली पाखरे येतात. तेंव्हा किंवा मध्यान्हीच्या कुशीतून घनपंचम एकू येतो तेंव्हाही ती त्याच्या वियोगामुळे सोसावे लागणारे असंख्य रात्रीचे पळसवणवे, स्वप्नांच्या वाटेवरील अनवाणी चाल सारे काही विसरते पण कातरवेळी मात्र तिची अवस्था अशी होते,

पण जेंव्हा
सर्व दिशांनी
धावत येते कातरवेळ
तेंव्हा मात्र
छळत राहते तुझी आठवण .
हट्टी मुलासारखी !

युगानयुगे प्रियकराची वाट पाहून कवयित्रीचे आयुष्य संपत आले तरीही त्याच्यासाठी आजही तिच्या मनामध्ये स्थान आहे. एका आश्वासक स्त्रीच्या भावना येथे येतात. ती म्हणते की, माझ्या या सख्याचा सांगावा कधी येईल नि वठल्या झाडास पुन्हा अंकूर फुटेल. प्रतीक्षा (क. क्र.४ - साजणवेळा) कवितेत प्रेयसीच्या मनात आलेले प्रेमानुभव हृदय आहे.

'साखळी' (क. क्र. १६ -साजणवेळा) या कवितेतील प्रेयसी आपल्या प्रियकराला म्हणते की माझे या अस्तित्वात असणे हे केवळ तुझ्यामुळेच आहे. तुझ्यासाठीच मी जन्मले आहे. पण तुझ्या विरहाने मी आज क्षणाक्षणाला मरण भोगते आहे.

तुझ्यामुळेच मी पुन्हा जन्मते
पुन्हा पुन्हा भोगते मरण
क्षणाक्षणावर तुझीच मुद्रा
आणि उगवतो सूर्य हि नवा

प्रियकराच्या प्रतीक्षेत प्रेयसीचे 'मी' पण संपून गेले आहे. त्याच्या प्रतिक्षेत चुर झालेल्या स्त्रीची अवस्था उत्कट आहे.

किती ओढ ही........ किती प्रतीक्षा
असून तुझी मी........ कुणीच नाही.

अशा आर्ततेने, व्याकुळतेने नि तितक्याच गहिवरलेल्या हृदयाने प्रतीक्षा करणारी प्रिया दिसते. त्याच्या प्रतिक्षेत रमलेली प्रिया स्वत:ला जशी बध्द झाडे तसे पाय माझे (पृ.३१- कातरवेळ) अशा अवस्थेत पानगळती खिन्नतेत तुरी बहरणाऱ्या मौनी कळ्या विसरु पाहते. पारवे तर दूरदेशी निघून गेलेले, येणाऱ्या गंधवार्ता तिला आश्वासित करतात. पण आता निराश मनाची खात्री पटण्याने एक पोकळी निर्माण झालेली आहे.

हातात उरते उणा देठ अवघा
रित्या राहती आर्त या ओंजळी
कंठात थिगतो अवघा पुकारा
तुरी वाढते काजळी...... पोकळी !

प्रियकराच्या प्रतिक्षेत ऋतु असेच सरले सारे अशी स्थिती होते. वसंत न येता पानगळच वाट्याला येते. छंदात बांधलेली झाडे वारा गदगदून हलवितो. जलाशयाच्या ओठी आता थकलेले उदास गाणेच उरते,

हे अष्टदिशांचे अद्रि ओठातच अडली गाणी
अन् पाणलोट होताना साकळते डोळा पाणी

ऋतु असेच सरुन जातात नि रित्या ओंजळीत हातात उरतो उणा देठ आणि उरी वाढते काजळी वेदनेची आणि एकाकीपणाची.

एकंदर कातरवेळ आणि साजणवेळामधील कवितांतून वियोगाचे दुख: व्यक्त करणाऱ्या कविता अधिक असल्या तरी त्यात एकसुरीपणा नाही. वेदनेचे इथे संयमित प्रदर्शन आहे. या कविता वाचल्यानंतर आपल्या वाट्याला आलेल्या दुख:ला सामोरे जाण्यात कवयित्री धन्यता मानताना दिसते.

## सामाजिक कविता :

मराठी कवितेतील सामाजिकता फार जुनी आहे. संतानी अभंगातून समाजाचे प्रबोधन करीत असताना अनेक सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकलेला आहे.महात्मा फुलेंनी 'अखंडा' तही जातीभेदासारख्या, विषमतेसारख्या सामाजिक प्रश्नांचा ऊटापोह केला आहे. आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत यांनी लोकिक अर्थाने सामाजिक कवितांचा प्रवाह मराठी कवितेत आणला. 'अंत्यज्याच्या मुलाचा पहिला प्रश्न', 'मजुरावर उपासमारीची पाळी' या त्यांच्या पहिल्या सामाजिक कविता. त्यातून पुढे ही परंपरा चालविणाऱ्या कवींचा 'तुतारी संप्रदाय' उदयास आला. कवी कुसुमाग्रज, मर्ढेकर, अनिल, विंदा करंदीकर, वसंत बापट, नारायण सुर्वे यांनी ही परंपरा पुढे चालविली.

प्रा. मंदा कदम या अंतर्मुख वृत्तीच्या, संवेदनशील मनाच्या कवयित्री आहेत. निसर्गावर भरभरुन प्रेम करणाऱ्या, रेशीम नात्यांला श्रेष्ठ मानणाऱ्या या कवयित्रीच्या सामाजिक कविताही तशाच संवेदनशील चिंतन प्रकट करण्याऱ्या आहेत. त्यात भावनांचा उद्रेक किंवा जहालता नाही. बकाल महानगरी , मुंबापुरी, तिथली जीवघेणी गर्दी आणि त्यात आत्मचैतन्य हरवून बसलेले लोक,

घराचे चित्तर काढ म्हणताच डोळ्यात ढग दाटलेला गरीब विद्यार्थी, आजचे भ्रष्ट राजकारण, साहित्यीकांना त्यात असणारी शून्य किंमत, भ्रष्ट जीवनाच्या प्याद्यांनी भ्रष्टाचाराच्या पटावर मांडलेला बुध्दीबळ, त्यात नितीमत्तेचा होणारा पराभव, अस्तित्वासाठी शोधाव्या लागणाऱ्या मुखवट्यांचा संक्षेप, धर्म, सत्ता, वंश, भाषा, वर्ण यांच्या भेदाने पेटलेले भडकलेले विश्व शांत करणारे काही 'गहिवर'. या साऱ्या प्रवृत्तींचा कवयित्रीने सामाजिक कवितेत उहापोह केला आहे. त्यातून तीची चिंतनशीलवृत्ती, समाजाचे सूक्ष्म निरीक्षण आणि बदलत्या सामाजिक स्थितीबद्दलची अस्वस्थता प्रकट होते.

'चित्तर' कवितेतील शाळकरी विद्यार्थ्याला गुर्जी शुध्द भाषेत 'घराचं चित्तर काडा' म्हणून सांगतात तेंव्हा त्याच्या डोळ्यासमोर त्याचे घर उभे राहते. गळकं छप्पर, मोडकं कवाड, दारातला चिखल, मागच्या बाजूने वाहणारा नाला, घरातील थंडगार चूल, उतरंडीची रिकामी गाडगी-मडकी, फाटकी दोन तीन चिरमुटं असे त्याचे घर आणि त्या घरात दारु पिऊन कोपऱ्यात झिंगून पडलेला 'बा' आणि दुसऱ्या कोपऱ्यात त्याचा मार खाऊन पडलेली आई हे चित्र उभे राहते. आपल्या घराच्या चित्रासाठी इतके मळकट रंग कुठून आणावेत हा प्रश्न या जीवाला पडतो.

इतर मुलांची नमुनेदार चित्रे पाहून गप्प असलेल्या मुलाकडे पाहून गुर्जी म्हणाले,

'बग लेका, किती ग्वाड चितरं
न्हायी तर तू ...... तसाच कोरडा
चितरं काढता येत नाही?
मग घर कसं बांधणार !'

आता मात्र हे बोलणे ऐकूण त्याच्या डोळ्यातले पाणी गालावर ओघळते. त्याची वेदना अश्रूतून वाहू लागते.

'आज काय सांगू गड्या
समदं घरंच न्हाऊन गेलं'

इथे अत्यंत दारिद्र्यात जगणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भावना कशा अश्रूरुप घेतात हे कवयित्रीने अतिशय परिणामकारक रीतीने स्पष्ट केले आहे. स्वत:च्या घराचे चित्र काढायचे म्हटल्यावर आपल्या घराच्या वास्तवरुपाने दु:खी झालेला हा विद्यार्थी आणि त्यात गुरुजी त्याचा उपहास करतात

14756

A

की, 'लेका तुला चित्र काढता येत नाही तर घर कसं बांधणार ! इथे सामाजिक विषमतेइतकीच विद्यार्थ्यांच्या बालमनाला घायाळ करणारी शिक्षकाची वृत्ती जाणवते. आपल्या वास्तव परिस्थितीच्या जाणिवेने गहिवरलेल्या विद्यार्थ्याच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागतात. आणि त्यात घराचे चित्र वाहून जाते हा कवितेचा शेवट कवितेतील भावनांचा उत्कर्षबिंदू गाठतो.

अशीच व्यथा 'हास्य' (कातरवेळ कविता क्र.९४) या कवितेत व्यक्त होते. माळावर निखरलेल्या, दुपारी छीन्नीचे घाव घालीत दगड फोडणाऱ्या, श्रमाचे महत्व सांगणाऱ्या मजुराची वेदना बोलकी आहे. तळपत्या उन्हात, घामाच्या धारा निथळत असताना या मजुरांचे चेहरे सुकले आहेत. यावरचे हास्य लोपले आहे.

'शरीर मुकले चैतन्याला
जितेपणी तण मरण भोगते
डंख मारिते व्यथा मनाला'

अशा अवस्थेत जगणाऱ्या या कुटुंबाचे लहान मुल झाडाला बांधलेल्या झोळीत पडले आहे. त्याचा चेहऱ्यावरचे ते निरागस हास्य पाहताना दगडांनाही पाझर फुटतो. तान्ह्याशी बोलताना, त्याच्या हुंकाराच्या नाचऱ्या शब्दांनी थकलेल्या नयनातही अवचित वात्सल्याचा पान्हा फुटतो. उन्हाची रखरख, दगड फोडतानाचे श्रम सारे काही तान्ह्याच्या हास्याने सुसह्य होते. मजुराच्या वेदनेला त्याच्या निरागस हास्याने दूर पळविले जाते. पहा,

'पान्हा फुटतो वात्सल्याचा
दुपार आहे निखारलेली
माळावरचे उष्ण उसासे
जळणाऱ्या हृदयातही फुलते
अवचित अल्लड हास्य जरासे !'

वरील कवितेत कवयित्रीने विराधाभासातून, मजुराच्या विदारक दु:खातून दारिद्र्यावर प्रकाश टाकलेला आहे.

आज समाजात नितीमूल्ये पायदळी तुडविली जातात, भावनाशुन्य व्यावहारिक जीवन जगताना संवेदनशील मनाची विलक्षण तडफड होते. ही तडफड 'संक्षेप' (कातरवेळ कविता क्र.६०) या कवितेतून व्यक्त झालेली आहे. कवयित्री म्हणते,

'किती शोधावेत मुखवटे
अज्ञातवासातील महाभारतासारखे
केवळ अस्तित्वासाठी'

आज लक्ष्मणरेषांचे सामर्थ्य आजमावीत असंख्य वेळांना रावणला परतावे लागले तरी आजच्या सीतेला अग्निदिव्य अटळ राहिली आहेत.

'गांधारीचे एक बरे होते
निदान डोळ्यावर
हक्काची पट्टी.......
शंभर गुणिले 'काही'
एवढ्याच दु:खांची
हकालपट्टी........

मानवताशून्य जीवनाचे वास्तव चित्रण कवयित्रीने केले आहे.

बुध्दिबळ या कवितेत राजकारणाने आज घेतलेले रुप, बुध्दिमतांना जरी मानवणारे नसले तरी भ्रष्ट जीवनाची प्यादी भ्रष्टाचाराच्या पटावर सरकवावीच लागतात. ते स्वत:ला मिळणारा अकाली शह टाळण्यासाठी असा हा बुध्दिबळ आहे. जिथे मग्रुर हत्तीची बेगुमान धडक, बेरकी उंटाचा तिरकसपणा, घोड्याची उडती चाल समजत असली तरी त्याच्यातून सहीसलामत निसटायचे असते. अशावेळी संवेदनशील मनाला शह काटशहाचे राजकारण फुटील डावपेच मानवत नाहीत आणि वाटते,

'वाटते-
पट उधळून द्यावा,
प्यादी फेकून द्यावीत
पण ...... भीती वाटते
विकतोतय मनाची !'

राजकारणात सत्तेसाठी चाललेले संघर्ष, फसवणूक, वर्चस्वासाठीची धडपड, डावपेच या सर्वांतून कवयित्रीच्या मनाला सुटका हवी आहे. पण गुलाम झालेले मन स्विकारण्यास तयार नाही. पश्चातापदग्ध भावनाशील कवयित्रीच्या उत्कट भाववृत्तीचे दर्शन येथे आपणास घडते.

अशाप्रकारे वरील कविता कातरवेळमधून येणाऱ्या सामाजिक कविता असून पराभव, संवाद, आणि गहिवर ह्या कवितांतून कवयित्रीने वास्तववादी सामाजिक समस्यांकडे लक्ष वेधले आहे. मंदा कदम यांच्या सामाजिक कविता परखड, क्रांतिकारी किंवा जहाल नाहीत. त्या कवयित्रीच्या वृत्तीच्या द्योतक आहेत. मात्र प्रस्तूत संग्रहातील वरील सामाजिक कवितात कवयित्रीला चिंतनशील वृत्तीचा प्रत्यय येतो.

## महानगरीय संवेदना :

मुंबई सारख्या महानगरात मर्ढेकरांपासून अनेक कवींनी आपल्या काव्याचा विषय बनविला आहे. त्यात नारायण सुर्वे, दिलीप चित्रे, सतीश काळसेकर, नामदेव ढसाळ, अरुण कोलटकर इत्यादी कवींचा उल्लेख करता येईल.

'मुंबापूरी' (कातरवेळ क.क्र.६२) या कवितेत कवयित्रीने मुंबईचे चित्रण केले आहे. घड्याळाच्या काट्यावर अनं लोखंडी रुळाच्या तंत्रावर जगणाऱ्या माणसांची नगरी म्हणजे 'मुंबापूरी'. चेंगरुन, जीव गुदमरुन टाकणारी लोकलमधील गर्दी, चाकरमान्यांना नेणाऱ्या लोकल गाड्या, या मुंबापूरीत आभाळही अपंग आहे. त्याचा कुडतरलेला एखादा तकडा बंदिस्त बाल्कणीत दिसतो पण तो ही कसा, तर लोकल बंद झाल्यावर वाढलेल्या गर्दीत अडकून पडलेल्या कोवळ्या मुलासारखा. कवयित्री म्हणते,

मुंबई ........
लोखंडी रुळांची वसाहत
छाटलेल्या वठलेल्या, माणसाच्या पायाखाली
रुळ तेवढे सर्वदूर, अनाकलनीय मृत्युघंटेसारखे

मुंबई ही लोखंडी रुळांनी भरलेली वस्ती आहे. म्हणजे या मुंबापुरीच्या नसा या इथल्या लोकल गाड्या. त्या जेंव्हा अचानक मध्येच थबकतात तेंव्हा प्रथम दिशांचे सामर्थ उमगते. जे य:कश्चित रुळांनी दाखवून दिलेले आहे. अशा वेळी हे रुळ प्रचंड गर्दीला बजावतात,

'तुमच्या वाटा आमच्या आहेत.'

गहाण पडलेल्या रस्त्यांवर थकलेले, नखे रंगविलेले, पादत्राणात लपविलेले, आळोखे पिळोखे देणारे पाय पाहून कवयित्रीला वाटते की पाय ,

'उसने उसने हसतात......
अगतिक वेश्यांसारखे !

अशा मुंबई सारख्या महानगराला, तिथल्या माणसांच्या जगण्यातील उध्वस्तपणाला अनेक सर्जनशील कवींनी संवेदनशीलतेने टिपले आहे. मर्ढेकरांच्या न्हालेल्या गर्भवतीच्या सोज्वळता महानगरात दिसली तर कोलटकरांना आगच आग. मंदा कदम यांनी या मुंबईकडे यंत्रयुगाची, तंत्रपर्वाची एक वाणिज्य वस्ती, मनुष्याचे अवमुल्यन करणारी वसाहत अशाच दृष्टीने पाहिले आहे.

## कौटुंबिक कविता :

मातृप्रेमाचा आविष्कार घडविणाऱ्या बऱ्याच कविता मराठी कवितेमध्ये लिहिल्या गेल्या आहेत. मात्र आजी-आजोबा, बहिण-भाऊ व इतर कौटुंबिक नातेसंबंधात मराठी कविता अडकली नाही. तरीही अर्वाचीन कवयित्री मंदा कदम यांनी एकत्रित कुटुंब, त्या कुटुंबात अग्रेसर असणारी आजी, तिच्या सर्व आठवणीसह 'चंदनाचे देणे' या संग्रहात आलेली आहे. प्रथमत: कवयित्री सांगते की,

तू मला आठवतेस
सावळ्या विठ्ठलाच्या सावळ्या ओवीसारखी
नीटनेटकी, चापून चोपून नेसलेल्या
नऊवारीतील, खणातल्या
चोळीतली, माथ्यावरच्या डौलदार पदरातली

(चंदनाचे देणे - पृ. ८)

यातून कवयित्रीच्या आजीचे व्यक्तिचित्र आपल्या समोर उभे राहते. ग्रामीण जीवनाचे संस्कार, त्यात झालेली जडणघडण, मराठमोळ्या संस्कृतीची जपणूक करणारी आजी आपणाला दिसते. तिचे रुप, तिने केलेली व्रतवैकल्ये, पूजाअर्चा, सणवार यांचा संदर्भ, जुन्या चालि, शेती, परंपरा यामधून मराठी स्त्रीचे विशिष्ट सांस्कृतिक जीवन कवितांमधील शब्दाशब्दांतून प्रकट होते.

आजीचे जगणे समजावून घेताना तिच्या भावजीवनाशी कवयित्री एकरुप झाली आहे. कवयित्रीचे अवघे जीवन, अस्तित्वच आजीने व्यापून टाकले आहे. कवयित्री म्हणते,

तिचं माझ्यातलं असणं
म्हणजे माझं गाणं
तिला वजा केलं तर
उरेल एक कलेवर केविलवाणं

(चंदनाचे देणे - पृ. १)

कवयित्रीच्या जीवनातील आजीला किती महत्वाचे स्थान होते याची जाणीव आपणाला होईल कारण तिला वजा केले तर हे सारं गाणंच नव्हते तिचे भावविश्व, संपूर्ण अस्तित्व केविलवाणे होवून जाईल.

कवयित्रीवर आजीने केलेले संस्कार साध्या साध्या प्रसंगातून दिसून येतात. तसेच ते सर्व कवयित्रीनेही जपून टेवले आहेत.

रांगोळी घालताना काय, तांब्याच्या मावळत्या दिनकरा ही कविता वाचताना काय, जेवताना पानात टाकायचे नाही ही शिकवण देताना काय, भाकरीसाठी पीठ मळताना काय वरील सर्व प्रसंगातून आजीचे जीवनविषयक तत्वज्ञान प्रकट झाले आहे.

संध्याकाळच्या वेळी त्यांना नका पिटू
झाडांनाही झोप हवी कळ्या नका तोडू

असे समर्पक उद्‌गार काढताना निसर्गाबद्दलच्या प्रेमाची जाणीव दिसून येते.

नारळ पाठवला, कुंकू वाढलं
बांगड्या वाढल्या

इत्यादी मध्ये आजी म्हणायची. म्हणजे जुन्या पिढीतील परंपरा जपणाऱ्या स्त्रीची आठवण येते आणि मंदा कदम यांची आजी या परंपरा डोळसपणे जपणारी एक स्त्री होती याची खात्री पटते.

एक प्रगल्भ जीवनदृष्टी, संस्काराचे वाण घेऊन उभी असलेली, निरक्षर असूनही सुसंस्काराचे सहज शिक्षण देणारी, मूल्यभाव शिकविणारी आजी. चंदनाचे देणे मधील सर्व कवितांच्या मधील केंद्रस्थानी आहे. ही सर्व तिचीच कविता आहे. पण त्याचबरोबर कवयित्रीच्या भाव जीवनाचा हळूवार भाव टिपणारी ही कविता आहे. शेवटी कवयित्री आजीला म्हणते,

एक धडपडणारे आयुष्य चिरशांतीच्या उंबरठ्यावर
एक तळमळणारे पाखरु तुझ्या अवतीभोवती

भीतीशिवाय,

पण अवघड वळणावर

'चंदनाचे देणे' मधील संपूर्ण कवितांचा आस्वाद घेताना लक्ष्मीबाईंच्या स्मृतीचित्रांची किंवा स्मरण साखळीची अथवा श्यामची आई या सारख्या पुस्तकांची आठवण व्हावी इतकी सहजता, सरलता, हृदयता इंदिरा संतांच्या कविताप्रमाणे याही कवितांतून जाणवत राहते.

कौटुंबिक पर्यावरणातील आई-वडील, आजी, बहीण - भाऊ, पती आणि मुले या नात्यांतून अस्सल स्त्रीरुप तर प्रकट होतेच त्याचबरोबर स्त्रीच्या जीवाभावाच्या 'माहेर' या नात्यातूनही तिचे खरे रुप प्रकट होते. कारण स्त्रीचे सगळे आयुष्यच सासर-माहेरशी प्रामुख्याने बांधलेले असते. स्वभाविकच सासर-माहेरच्या माणसाभोवती भिरभिरणारे मनच गीतरुप होते. माहेरची माणसे अधिक जवळची आई-वडील, बहिण-भाऊ, आजी इत्यादी येतात. त्यांच्या विषयीचे प्रेम आदर, जिव्हाळा, कृतज्ञता त्यामुळे अनेक वाटांनी व्यक्त होते. कवयित्री म्हणते,

माझ्या माहेरची वाट
जडवाची मखमल
रंग उधळीत जाती
स्वप्न पिसोळ्यांचे बोल

(साजणवेळा - पृ. ६८)

अशा या माहेरच्या वाटेवर कवयित्रीला मोहरलेले आंब्याचे झाड, बुलबुल पक्षी, एकताणतेने सुर काढणारी कोकिळा, नदीचे पात्र, काठावर असणारे कण्हेरीचे झाड, वडाचा पार, कडुनिंबाचे झाड दिसते. इथे मंदा कदम यांची कविता बहिणाबाईंच्या वळणाने जाताना दिसते. कारण बहिणाबाईही माहेरच्या वाटेचे वर्णन करताना त्यांची मायेने जपणूक करणाऱ्या रस्त्यावरच्या साध्या दगडालाही विसरत नाहीत. त्या म्हणतात,

माझ्या माहेरच्या वाटे
जरी लागल्या रे ठेचा
वाटेवरल्या दगडा तुला
फुटली रे वाचा

(बहिणाईंची गाणी - पृ. ३१)

एकंदर मंदा कदम यांची साजण वेळामध्ये येणारी कौटुंबिक आशयाची कविता ही बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेशी समांतर अशीच आहे. अशा तऱ्हेने बहिणाबाईंच्या भावमनाचे

गूढ आकर्षण कवयित्रीला असल्याचे आपणाला जाणवते. कवयित्री पुढे सांगते की, अशा या माहेरची ओढ प्रत्येक स्त्रीमनात तीव्रपणे असते. कारण आपुलकी, ममत्व, जिव्हाळ्याचे बोल स्त्रीला माहेरीस एेकू येतात. त्या म्हणतात,

कधी आलीस ग बाई
कशी आहेस गं मैने
का ग कोमेजली जाई
बोल येती जिव्हाळ्याने

(साजणवेळा - पृ. ६८)

अशाप्रकारे जेंव्हा आजी आपल्या नातीची चौकशी करते तेंव्हा तीचे मन मोहरुन येते. आनंदाने सारा क्षीण उतरतो. पुढे ती म्हणते,

मन होते पिसापरी
ओझे टाकायास सये
होते माहेर ओसरी

माहेरचे स्त्रीचे जीवाभावाचे नाते असते. इथे एक हळवे, संवेदनशील स्त्रीमन सर्व जाणीवांसह प्रकटते. जीवनाची वाटचाल करताना एका विशिष्ट ठिकाणी थकल्यासारखं कवयित्रीला वाटते. ते हलके करण्यासाठी घातलेली आर्त हाक आहे. 'का ग कोमेजली जाई' या समपर्क सूचकवृत्तीतून संसाराच्या ओझ्याने थकून गेलेल्या स्त्रीच्या रुपाचे दर्शन घडते.

'आई' (साजणवेळा - पृ. ६९) कवितेतून कवयित्रीने आईचे पहाटेपासून जात्यावर दळण दळता निघालेले भक्तीभाव प्रकट केले आहेत. आईविषयीच्या आठवणीत बुडून गेलेली कवयित्री इथे हृदयस्थ भाव व्यक्त करते. शेवटी आर्ततेन म्हणते की.

तू निघून जाता आई
हे गाव पोरके झाले

## व्यक्तिपर कविता :

दैनंदिन जीवनामध्ये माणसाला कित्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या कारणांनी सतत भेटत असतात. आयुष्यात भेटणाऱ्या अगणित व्यक्तीपैकी काही व्यक्ती मनात घर करुन जातात. काही

लेखक त्यांना शब्दबध्द करुन अमर ठेवतात. थोर संत, समाजसुधारक, ऐतिहासिक व्यक्ती, आदर्श स्त्री-पुरुष यांच्यावरही कविता केल्या जातात. मराठी काव्याच्या प्रांतात ही परंपरा फार जुनी आहे.

मंदा कदम यांन 'साजणवेळा' मध्ये प्रीतीचा विविधांगी आविष्कार घडविताना आजच्या अनेक श्रेष्ट-ज्येष्ठ साहित्यिकांचा गौरव केला आहे. कविता क्रमांक ६६ व ६७ ह्या कविवर्य कुसुमाग्रजांविषयीची अपार भक्ती आणि त्यांच्या साहित्याचे विशालत्व व्यक्त करतात. तर पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यिक थोरवीची गाथा गाणारी 'शब्दांची वरात' ही क्र. ६८ ची एक दीर्घ कविता समाविष्ट केली आहे.

'दिगंतरेतील इंदिरेसाठी' या एकोणसत्तर क्रमांकाच्या कवितेतून इंदिरा संत यांच्या सहवास, शेला, मृगजळ, रंग बावरी, बाहुल्या, मृणयी, चित्कळा, गर्भरेशीम, वंशकुसम इत्यादी काव्य संग्रहातून इंदिरा संतांनी घडविलेला अनुभूतीचा विविधांगी आविष्कार या प्रत्येक संग्रहातील कवितांचे बदलत गेलेले स्वरुप, त्या कवितेच्या आशयाची जाणीव स्थूलमानाने कवयित्रीने प्रस्तुत केली आहे. इथे इंदिरा संत या ज्येष्ठ कवयित्रीविषयीच्या आदरयुक्त जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेल्या भावनांचा आविष्कार आहे.

अखेरची दीर्घ कविता दलित, भटके, बारा बलुतेदार, भूमिहीन, नवबौध्द यांच्याविषयी तळमळीने लिहिणाऱ्या कै. शंकरराव खरात या ज्येष्ठ साहित्यीकाचे काव्यकर्तृत्व वर्णन केले आहे.

## मराठी अस्मिता प्रकट करणारी कविता :

मराठी माणसांना मातृभूमी विषयी, आपल्या मातीविषयी अभिमान असतो. म्हणून तिचा गौरव केला जातो.

मायमराठी या 'साजणवेळा'मधील ७१ व्या कवितेत कवयित्रीने मराठी मातीत ज्यांनी अलौकिक कार्य करुन तिची आस्मिता जपली. त्यांच्या कार्य कर्तृत्वाचा आढावा घेतलेला आहे.

ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीद्वारे सांगितलेले तत्वज्ञान, महानुभवांचा आचार-विचार, मुक्ताबाई, जनाबाई, नामदेव, एकनाथ, तुकाराम व अन्य संतानी गायिलेली अभंगवाणी, पंडितांचे पंडीती ज्ञान, तत्वज्ञान, शाहिरांचे लावणी व पोवाडे यांचे वर्णन कवितेत येते. त्याचबरोबर अर्वाचीन कवी केशवसुतांचे समाजचिंतन, बालकवींचा निसर्ग, गोविंदाग्रजांचे प्रेमविषयक काव्य, कोल्हटकरांची

नाट्यधारा, आगरकरांची निबंधसारणी, महात्मा फुलेंची समाजसुधारणा, दलितांच्या व्यथा वेदनांनी चित्रीत करणारी मराठी साहित्यसृष्टी इत्यादींचा गौरव कवयित्रीने केला आहे. शेवटी ती म्हणते,

'माय मराठी आमुची माता महिमा अपरंपार
शब्द फुलांनी बांधून पूजा करितो नवझंकार'

माय मराठीचा महिमा कवयित्रीने इथे सार्थ शब्दात व्यक्त केला आहे.

## सारांश :

प्रबंधाच्या या प्रकरणात आपण मंदा कदम यांच्या कातरवेळ, साजणवेळ, चंदनाचे देणे, ऋतुनाद या काव्य संग्रहातील कवितांचे स्वरुप समजावून घेतले आहे. 'कातरवेळ' हा त्यांचा पहिलाच संग्रह असला तरी कविता रचनाबध्द नाहीत असे नसून रसिकांना त्या अंर्तमुख बनवितात. मराठी समीक्षकांनी त्यांची जाणीवपूर्वक दखल घ्यावी अशा आहेत. यामधील कवितांचा हेतू मुळातच सृष्टीदर्शन अथवा प्रेमप्रकटीकरण नसून सृष्टीतील वस्तूंचे निमित्त करुन मानवी जीवनातील जगण्याशी साम्य दाखविणारे आहे. यामध्ये सौंदर्य आहे, नाद आहे नि लय आहे. संवेदनशील मनाने रसिकवृत्तीने इथे अनुभव टिपलेले आढळतात. कवितांमध्ये उत्कटता, विरहता, एकाकीपणा या भावजाणिवांना प्राधान्य दिले आहे. कातरवेळ दाटून येणाऱ्या आठवणीच्या विविध रंगातून व्यक्त झालेले गहिरे दु:ख यातून नवीन काव्यांची रचनात्मकता प्रत्ययास येते.

साजणवेळा, चंदनाचे देणे आणि ऋतुनाद या संग्रहातील कवितांचे स्वरुप, आशय, रचना, विषयांची विविधता, विविधांगी अनुभव व्यक्त करण्याची हातोटी पाहून ह्या कवितांचे निसर्गकाव्य, प्रेमकाव्य, सामाजिक,कौटुंबिक आणि व्यक्तिपर काव्य असे वर्गीकरण या प्रकरणात केले आहे. प्रेमातील सौदर्य निसर्गातील अनुभूती, साजाणच्या आठवणीतील भाव तर कधी सामाजिक, कौटुबिक जगण्याच्या संदर्भातून त्यांच्या कवितांचा वेध घेतला आहे. ही कवयित्री स्वच्छंदी आहे. आणि धूसर भावविश्वात रमणारी, निसर्गाच्या विविध रुपात आपल्या आवृत्तीची प्रतिबिंबे बघण्याचा तिला छंद आहे. त्यामुळे मंदा कदम यांच्या कवितेची जात कुळी पाडगांवकर, बोरकर, इंदिरा संत, ना. घ. देशपांडे याच्या कवितांसारखी आहे. तरीही कुणाच्या अनुकरणात न अडकता ह्या कवयित्रीच्या कविता साध्या पण मानवी जीवन व्यापून टाकणाऱ्या आहेत.

## संदर्भ


१) उद्धृत : अर्वाचीन मराठी काव्यदर्श : डॉ. अक्षयकुमार काळे : श्री. ना. बनहट्टी प्रकाशन : १९९९ पृ. २०, ७४.

२) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : १९९१ - प्रस्तावना

३) तत्रैव : १०

४) तत्रैव : १८

५) तत्रैव : ३७

६) तत्रैव : ४२

७) तत्रैव : ५९

८) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर :२००१ पृ. २

९) ऋतुनाद : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : २००४ पृ.२

१०) तत्रैव : पृ. १५

११) तत्रैव : पृ. २२

१२) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : २००१ प्रस्तावना

१३) सांजणवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृ. १९

१४) तत्रैव : पृ. २७

१५) ऋतुनाद : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृ. ११

१६) तत्रैव : पृ. १४

१७) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृ. १९

१८) तत्रैव : पृ. १

१९) तत्रैव : पृ. ३०

२०) तत्रैव : पृ. १६

२१) तत्रैव : पृ. ७

२२) तत्रैव : पृ. ६

२३) तत्रैव : पृ. १५

२४) तत्रैव : पृ. ३२

२५) निहार : पद्मा गोळे : पृ. ४४

२६) कातरवेळ : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : १९९१ : पृ. ७१, ६४, ६७, ६१, ६२

२७) चंदनाचे देणे : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : २००४ : पृ. ८, १

२८) सांजणवेळा : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृ. ६८

२९) बहिणाबाईंची गाणी : संपा. सोपानेदव चौधरी पृ. ३१

३०) सांजणवेळा : मंदा कदम : हिरण्यकेशी प्रकाशन कोल्हापूर : पृ. ६९